# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

## परिपत्रक

**''शिष्यवृत्ती योजनांची सन. २०२२—२३ करीता महाडीबीटी पोर्टलवर प्रोफाईल अद्ययावत करणेबाबत''**

या परिपत्रकाद्वारे सर्व संबंधिताना कळविण्यात येते की, मान्यताप्राप्त व्यावसायिक व बिगर व्यावसायिक अभ्यासक्रमामध्ये शिकणाऱ्या आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील पात्र विद्यार्थ्यांसाठी ''राजर्षी शाहू महाराज शिक्षण शुल्क योजना'' व ''डॉ. पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजना'' अशा एकुण १४ शिष्यवृत्यांचा समावेश आहे. तसेच मागासवर्ग प्रवर्गासाठीच्या शासनाच्या विविध शिष्यवृत्ती/फ्रिशिप योजना https://mahadbtmahait.gov.in या संकेतस्थळावर कार्यान्वित करण्यात आलेल्या आहेत.

शासनाने दिलेल्या सुचनेनुसार महाविद्यालयांचे Institute Profile अद्ययावत करून मान्यता घेणे बंधनकारक आहे. यासंदर्भात शासनाचे संदर्भ पत्र क्र. उशिसं/शिष्य.२०२१—२२/डीबीटी/१२१७९, दि. ०३/१०/२०२२ अन्वये कळविण्यात आले आहे. सोबत पत्र जोडले आहे. अद्यापही ज्या महाविद्यालयांनी याबाबत कार्यवाही केलेली नाही. अशा महाविद्यालयांनी Institute Profile त्वरीत अद्ययावत करून मान्यता घेण्यात यावी. तसेच महाविद्यालयांनी महाडीबीटी पोर्टलवरील प्रोफाईल अद्ययावत करण्यासाठी वर्क शॉपचे आयोजन करण्यात यावे व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल संचालनालयास सादर करण्यात यावा.

तरी, अद्ययावत केलेल्या Institute Profile ला मान्यता घेऊन जास्तीस जास्त विद्यार्थ्यांना या योजनेचा लाभ घेता येईल याची काळजी घेण्यात यावी. सदर योजनेपासून विद्यार्थी वंचित राहिल्यास याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित महाविद्यालयाची राहिल याची नोंद घ्यावी.

उपकुलसचिव,
शैक्षणिक प्रवेश विभाग

गणेशखिंड पुणे — ७
संदर्भ : शै. प्रवेश/४८८७
दिनांक : १३/१०/२०२२

प्रत:

मा. प्राचार्य/संचालक, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ संलग्नित महाविद्यालये/संस्था.

D:\Vishnu\MAHADBT Circular 2022-23.docx

# महाराष्ट्र शासन
# शिक्षण संचालनालय (उच्च शिक्षण)
# महाराष्ट्र राज्य मध्यवर्ती इमारत पुणे ०१

web: www.dhepune.gov.in　　Mail: schol.dhepune@gov.in

फोन नं.०२०/२६१२६९३९　　फॅक्स ०२०/२६१११११५३


क्र.उशिसं/शिष्य.२०२१-२२/डीबीटी/ /१२१७१　　दि. 0 3 OCT 2022

प्रति,

कुलसचिव,
सर्व अकृषि विद्यापीठे.

**विषय :- शिष्यवृत्ती योजनांची सन २०२२-२३ करीता महाडीबीटी पोर्टलद्वारे ऑनलाईन पध्दतीने अंमलबजावणी करणेसाठी महाविद्यालय / संस्था / विद्यापीठ यांनी त्यांचे प्रोफाईल अद्ययावत करणेबाबत.**

संदर्भः-
१. शासन निर्णय क्र. स्कॉलर-४९१७/प्र.क्र. १४६/मशि-२, दि. ०२.०८.२०१७
२. शासन निर्णय क्र. संकीर्ण-२०१७/प्र.क्र. ३३२/तांशि-४, दि. ०७/१०/२०१७
३. शासन निर्णय क्र. GAD-मातंस–2018/C.R.138/S.1/39, दि. १२.१०.२०१८
४. महाआयटी यांचा दि. १२.०८.२०२२ रोजीचा इमेल.

राज्य शासन पुरस्कृत विविध विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या शिष्यवृत्ती योजनांची महाडीबीटी पोर्टलवरुन एकत्रितपणे ऑनलाईन पध्दतीने अंमलबजावणी करण्यात येत आहे. सदरहू महाडीबीटी पोर्टलवर उच्च शिक्षण संचालनालयामार्फत राबविण्यात येणाऱ्या १४ शिष्यवृत्ती योजनांचा समावेश आहे.

महाडीबीटी पोर्टलवरुन विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीचे अर्ज भरण्यासाठी त्यांचे महाविद्यालयाचे महाडीबीटी पोर्टलवर प्रोफाईल अद्ययावत असणे आवश्यक आहे. ज्यामध्ये महाविद्यालयाचा नाव, पत्ता, लिपीक व प्राचार्य यांचे नाव व भ्रमणध्वनी क्रमांक तसेच महाविद्यालयातील अभ्यासक्रम व अभ्यासक्रमांचे शुल्क अद्ययावत करणे आवश्यक आहे. संदर्भिय क्र. ४ महाआयटी कार्यालयाच्या इमेलनुसार, **सन २०२२-२३ करीता महाडीबीटी पोर्टलवरील शिष्यवृत्तीसाठी महाविद्यालय / संस्था / विद्यापीठ यांना त्यांचे प्रोफाईल अद्ययावत करण्याची सुविधा दि.११.०८.२०२२ पासून देण्यात आलेली आहे.**

सद्यस्थितीत अनेक महाविद्यालयांचे त्यांचे प्रोफाईल अद्ययावत करण्यात आलेले नाही. विनाअनुदानित, कायम विनाअनुदानित महाविद्यालये सदरहू विषयाबाबत प्रतिसाद देत नसल्याचे निदर्शनास आलेले आहे. महाविद्यालयांनी / संस्थांनी / विद्यापीठांनी त्यांचे प्रोफाईलमध्ये भरलेल्या अभ्यासक्रमांच्या शुल्कास संबंधित विभागीय सहसंचालक / शिक्षण शुल्क समिती / शुल्क नियामक प्राधिकरण यांनी मंजूरी दिल्यानंतर त्यानुसारच शिष्यवृत्तीचे लाभ विद्यार्थ्यांना देण्यात येतात. सदर प्रक्रिया पूर्ण केल्यानंतरच विद्यार्थ्यांना ऑनलाईन अर्ज करता येतात त्यामुळे सदरची माहिती काळजीपूर्वक व तात्काळ भरणेबाबत आपल्या स्तरावरुन विद्यापीठाशी संलग्नित असलेल्या अशासकीय अनुदानित, विनाअनुदानित, कायम विनाअनुदानित महाविद्यालयांना सूचना देण्यात याव्यात. तसेच महाविद्यालयांना महाडीबीटी

पोर्टलवरील प्रोफाईल अद्ययावत करण्यासाठी वर्कशॉपचे आयोजन करण्यात यावे व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल संचालनालयास सादर करण्यात यावा.

तसेच आपल्या विद्यापीठामार्फत राबविण्यात येणाऱ्या सर्व अभ्यासक्रमाची अद्ययावत फीबाबतची माहिती तात्काळ प्रसिध्द करण्यात यावी.

(डॉ. धनराज माने)
शिक्षण संचालक, उच्च शिक्षण
महाराष्ट्र राज्य, पुणे - १.

प्रत : माहिती व कार्यवाहीसाठी.

१. सर्व विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण.
२. मा. सचिव, शुल्क नियामक प्राधिकरण, मुंबई.
३. सहसंचालक, शिक्षण शुल्क समिती, मुंबई.

प्रत :- माहितीस्तव सविनय सादर.

१. मा. अप्पर मुख्य सचिव, अल्पसंख्यांक विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
२. मा. प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई.
३. मा. प्रधान सचिव, माहिती व तंत्रज्ञान विभाग, मंत्रालय, मुंबई.